आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१५ ऑक्टोबर २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नक्षलवादी चळवळीतला वरिष्ठ नेता भूपतीचं गडचिरोलीत आत्मसमर्पण, राज्यातला नक्षलवाद संपल्यात जमा असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- सोलापूर-मुंबई विमानसेवेला आजपासून सुरुवात

- मतदारयादीतल्या त्रुटी दूर होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याची विरोधी पक्षांची मागणी

**आणि**

- देशातल्या शेअर बाजारात जोरदार तेजी, सेन्सेक्स पावणे सहाशे अंकांनी वधारला

**<><><><><>**

नक्षल चळवळीतला मोठा नेता, माओवाद्यांची केंद्रीय समिती आणि पॉलिट ब्युरोचा सदस्य असलेला मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ भूपती याच्यासह ६१ नक्षलवाद्यांनी आज गडचिरोलीत आत्मसमर्पण केलं. भूपतीचं आत्मसमर्पण हा नक्षली चळवळीसाठी मोठा धक्का असल्याचं मानलं जातंय. यामुळं राज्यातला नक्षलवाद संपल्यात जमा असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**कॅप्सूल**

*(काही महिन्यांपूर्वी भूपतीची पत्नी ताराक्का हिनं गडचिरोलीत शस्त्र टाकली होती. तेव्हाचं भूपतीही शरण येणार हे संकेत मिळाले होते. गेल्या काही दिवसांपासून भूपती आणि त्याच्या सहकाऱ्यांशी शरणागतीसंबंधी चर्चा सुरू होत्या. मुख्यमंत्र्यांच्या समोरच शरणागती पत्करणार ही त्याची अट सरकारनं आज मान्य केली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस संविधानाची प्रत देऊन कायद्याच्या मार्ग स्वीकारल्याबद्दल आत्मसमर्पित नक्षलवाद्यांचं स्वागत केलं. भूपतीवर विविध*

*राज्यात मिळून साडे ५ कोटी रुपयांहून अधिक बक्षिस होतं. उत्तर गडचिरोली पाठोपाठ दक्षिण गडचिरोलीतला नक्षलवाद संपुष्टात आणण्याच्या दिशेनं टाकलेलं हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.*

***होल्ड - मुख्यमंत्री बाइट***

*आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांचं उत्तम पुनर्वसन करण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं. फेब्रुवारी महिन्यात आत्मसमर्पण केलेल्या दोन नक्षलवाद्यांना पुनर्वसनासाठी प्रातिनिधिक स्वरुपात प्रत्येकी अडीच लाख रुपयांचे धनादेश मुख्यमंत्र्यांच्या हस्ते देण्यात आले. आत्मसमर्पण न करणाऱ्यांना गंभीर परिणामांना सामोरं जावं लागेल असा इशाराही फडनवीस यांनी चळवळीतल्या नक्षलवाद्यांना दिला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी गडचिरोली पोलिस दलाला एक कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर केलं. )*

**<><><><>**

देशातल्या नक्षलवादाचा अतिप्रभाव असलेल्या जिल्ह्यांची संख्या ३ पर्यंत कमी झाली आहे. तर एकूण नक्षल प्रभावित जिल्ह्यांची संख्या १८ वरुन ११ पर्यंत घसरली आहे, असं केंद्रीय गृहमंत्रालयानं सांगितलं आहे.

सध्या छत्तीसगडमधल्या बिजापूर, सुकमा आणि नारायणपूरमध्ये मोठ्या प्रमाणात नक्षलवादी आहेत. २०१३ मध्ये देशातल्या १२६ जिल्ह्यांमध्ये नक्षलवाद्यांचा प्रभाव होता. यंदाच्या मार्चमध्ये ही संख्या १८ पर्यंत, आणि आता ११ पर्यंत कमी झाली आहे. येत्या ३१ मार्चपर्यंत देशाला नक्षलवादमुक्त करण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. यंदाच्या वर्षात सीपीआय माओवादी पक्षाचा सरचिटणीस, तसंच पॉलिट ब्युरो आणि केंद्रीय समितीचे ८ सदस्य यांच्यासह ३१२ नक्षलवादी विविध ठिकाणी चकमकीत मारले गेले. ८३६ जणांना अटक झाली, तर सोळाशेहून अधिक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे. यामुळं गेल्या अनेक वर्षातले विक्रम मोडीत निघाले आहेत.

**<><><><>**

छत्तीसगडमधे सुकमा इथं ५० लाखांचं बक्षीस लागलेल्या २७ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. त्यात पीएलजीए बटालियन क्रमांक १ मधे

सक्रीय असलेल्या २ कट्टर माओवाद्याचा समावेश असल्याचं सुकमाच्या पोलीस अधीक्षकांनी सांगितलं.

<><><><><>

सोलापूर-मुंबई या नव्या विमानसेवेमुळे सोलापूर परिसरातल्या औद्योगिक विकासाला गती आणि पर्यटन क्षेत्राला चालना मिळेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. सोलापूर-मुंबई विमान सेवेला सुरुवात केल्यानंतर ते बोलत होते.

लवकरच सोलापूरला आयटी पार्क उभारला जाईल. त्यामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विविध पोलीस स्थानकांच्या इमारतीचं दूरस्थ पद्धतीनं उद्घाटन करण्यात आलं.

<><><><><>

शेतकऱ्यांच्या सेंद्रीय उत्पादनांचं प्रमाणीकरण करणाऱ्या संस्था राज्यातल्या शेतकऱ्यांच्या हिताविरोधात कोणतंही कृत्य करत असतील तर ते खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिला आहे. ते आज मंत्रालयात सेंद्रिय प्रमाणीकरण संस्थासंदर्भात आयोजित बैठकीत बोलत होते.

शेतकऱ्यांच्या उत्पादनांचं प्रमाणीकरण करणाऱ्या संस्थांनी दिलेल्या सेंद्रीय प्रमाणपत्रांची राज्य सरकार तपासणी करणार आहे. यात दोषी आढळलेल्या संस्थांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत अहवाल केंद्र सरकारकडे पाठवेल, असं भरणे म्हणाले.

**<><><><><>**

मतदारयादीतल्या त्रुटी दूर होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलाव्यात अशी मागणी महाविकास आघाडी आणि इतर पक्षांनी आज राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे. विरोधी पक्षांच्या प्रतिनिधीमंडळानं आज मुंबईत मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम आणि राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट घेतली. या भेटीचा वृत्तांत जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**कॅप्सूल**

*(स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या विधानसभा मतदारसंघाच्या यादीतल्या त्रुटी दूर कराव्या, VVPAT चा वापर करावा, आदी मागण्या विरोधी पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे केल्या आहेत. या मागण्यांचा सकारात्मक विचार करू, असं आश्वासन राज्य निवडणूक आयोगानं दिल्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात येणार नाही, मतदानाचे सीटीटीव्ही फूटेज दाखवले जात नाहीत, मतदार याद्या विरोधी पक्षांना दाखवल्या जात नाहीत, हे अयोग्य असल्याची टीका त्यांनी केली.*

***होल्ड बाईट उद्धव ठाकरे***

*निवडणूक  आयोगाच्या उत्तरानं आपलं समाधान झालं नसून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला सामोरं जाणं योग्य नाही, असं काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात म्हणाले. निकोप निवडणूक लोकांचा अधिकार असून त्यात हस्तक्षेप योग्य नाही, असंही ते म्हणाले.*

***होल्ड बाईट थोरात***

*राज्य निवडणूक आयोग आणि केंद्रीय निवडणूक आयोग टोलवाटोलवी करत असल्याची टीका मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली.*

*राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी मतदार यादीतल्या काही त्रुटी माध्यमांसमोर दाखवल्या. एकाच घरामधे हजारो मतदार असणं, अनेक घरांना क्रमांक नसणं, एकाच मतदाराचं नाव अनेक ठिकाणी असणं, वयाच्या नोंदीत घोळ अशी उदाहरणं पाटील यांनी माध्यमासमोर वाचून दाखवली. निवडणूक आयोगाचं संकेतस्थळ दुसरंच कुणीतरी हाताळत असल्याचा आरोप पाटील यांनी यावेळी केला.*

*यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत पाटील, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, शेकापचे नेते जयंत पाटील, माकपचे नेते अजित नवले, भाकपचे सुभाष लांडे उपस्थित होते.*

***स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या विधानसभा मतदारसंघांच्या यादीत नव्यानं नावं समाविष्ट करणं, अथवा वगळणं किंवा अन्य बदल करण्याचा विषय राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेत येत नसल्याचं राज्य निवडणूक आयोगानं यापूर्वीच स्पष्ट केलंय.)***

**<><><><><>**

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मोठ्या घसरणीला देशातल्या शेअर बाजारांनी आज मोठ्या तेजीसह विराम दिला. जागतिक बाजारपेठेतलं सकारात्मक वातावरण आणि कच्च्या तेलाच्या घसरलेल्या किंमतीमुळं देशातले शेअर बाजार आज सकाळपासून तेजीत होते. दिवसअखेर सेन्सेक्समधे ५७५ अंकांची वाढ झाली आणि तो ८२ हजार ६०५ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १७८ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ३२३ अंकांवर बंद झाला.

***//<><><><><>//***